**फुगेवाडी मेट्रो स्टेशनच्या कामासाठी जुना मुंबई -पुणे महामार्गावरील वाहतुकीत बदल**

पुणे , १६ सप्टेंबर २०२० :

महामेट्रो पुणेचे काम लॉकडॉऊनच्या काळातही प्रगतीपथावर आहे. तसेच पिंपरी चिंचवड या मार्गिकेवरील कामही अतिशय वेगाने सुरु आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी-चिंचवड शहरातील भोसरी वाहतूक विभागातील पुणे मेट्रोच्या कामाअंतर्गत जुन्या मुंबई- पुणे महामार्गावर श्री आई माता मंदिर ते मीनाताई ठाकरे शाळेच्या आत येण्याच्या रस्त्यापर्यंत ( मर्ज इन) फुगेवाडी मेट्रो स्टेशनचे काम ग्रीन झोन मध्ये करण्यात येणार असल्याने श्री आई माता मंदिर ते मीनाताई ठाकरे शाळेच्या आत येण्याच्या रस्त्यापर्यंतची ( मर्ज इन) ग्रेड सेपरेटर रस्त्या वरील वाहतूक ही दिनांक १६/०९/२०२० ते दिनांक ०५/१०/२०२० पर्यंत सकाळी ११ :०० ते सायंकाळी ०६ :०० व रात्री ११ :०० ते सकाळी ०६ :०० वाजे पर्यंत सर्व्हिस रस्त्याने वळविण्यात आली असून बी. आर. टी. एस. मार्ग हा वरील मुदतीत बंद ठेवण्यात आलेला आहे.

तरी नागरिकांनी मेट्रोच्या कामास सहकार्य करावे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे ४११०१८
स्थापत्य बीआरटीएस विभाग
क्र.स्था/ बी.आर.टी.एस/६३८/२०२०
दि. १५/०९/२०२०

प्रति,

ACPM R-1 (Stations)
महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि.,
१०१, ओरीयन बिल्डींग,
कोरेगाव पार्क पुणे-०१

विषय– Regarding Diversion of BRT road st Phugewadi Station for FOB column / footing Construction work…(Pune Side)

संदर्भ- आपले पत्र क्र.Maha Metro/ PMRP/LR1159 दि.०४/०९/२०२०

उपरोक्त विषयांकित बाबत मेट्रो स्टेशनचे कामासाठी फुगेवाडी येथे FOB column / footing चे पुणे बाजुकडील कामासाठी बीआरी रोड डायव्हर्जन बाबत कळविले आहे. सदर जागेची पाहणी केली असुन वाहतुक सुरक्षेची योग्य ती काळजी घेऊन व बीआरटी लेन मध्ये कॉलम फुटींगचा व कॉलमचा कोणताही अडथळा होणार नाही अश्या पध्दतीने काम करणेस मनपाची हरकत नाही.

तथापि याबाबत वाहतुक पोलिसांच्या परवानगीने सल्यानुसार वाहतुकीचे योग्य नियोजन करावे व सुरळित व सुरक्षित वाहतुकीसाठी योग्य ती काळजी घेणेत यावी. सदरचे काम पत्र दिले पासुन २० दिवसांत पुर्ण करुन मनपास अवगत करणेत यावे.

कार्यकारी अभियंता
स्थापत्य बीआरटीएस
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

प्रत– मा. सह शहर अभियंता, बीआरटीएस स्थापत्य,
यांना माहितीसाठी सविनय सादर.

125/B.Shete /Jan 2020